ePaper

भारत समिटमध्ये इटालियन नेत्याच्या 'व्होट चोर, गद्दी छोड' घोषणेला राहुल गांधींची टाळ्या वाजवून दाद

वर्ष - 9 | UDYAM-MH-26-0158827

महाईन्यूज™

WWW.MAHAENEWS.COM | सोमवार, दि. 16 नोव्हेंबर 2026 | पुणे, पिंपरी-चिंचवड आवृत्ती | MAHAENEWS.COM | लढाई सत्याची... लोकशाहीच्या हक्काची!





पान 3 वरुन...

दिवाळीच्या आतषबाजीने सात दिवसांत ९,६९५ टन कचरा!

आदिवासी उत्थानाचा मोदींचा निर्धार; गडचिरोलीत ३ हजार कोटींच्या विकासकामांचा शुभारंभ

'नक्षलवादावर निर्णायक प्रहार' : नरेंद्र मोदी


महाईन्यूज । नवी दिल्ली

नक्षलवाद आणि माओवादी दहशतीच्या संकटातून भारत मुक्त होण्याच्या दिशेने मोठे यश मिळवत आहे. देशातील जवळपास ५० कोटी नागरिकांनी गरिबीवर मात केली असून, ही भारताच्या विकासयात्रेतील ऐतिहासिक उपलब्धी आहे, असे प्रतिपादन पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी केले. जनजातीय गौरव दिनानिमित्त महाराष्ट्रातील गडचिरोली येथे आयोजित कार्यक्रमाला व्हिडिओ कॉन्फरन्सिंगद्वारे संबोधित करताना त्यांनी आदिवासी समाजाचा गौरव, विकास आणि नक्षलवादाविरोधातील लढ्यावर भाष्य केले.

भगवान बिरसा मुंडा यांच्या १५१ व्या जयंतीनिमित्त देशभरातील आदिवासी बांधवांना 'जोहार' म्हणत मोदी यांनी अभिवादन केले. आदिवासी समाजाचा इतिहास, संस्कृती आणि देशाच्या उभारणीत असलेले योगदान अनमोल असल्याचे त्यांनी नमूद केले. पूर्वी देशातील अनेक दिवस आणि उत्सव परकीय दृष्टिकोनातून निश्चित केले जात होते. मात्र, आता भारत स्वतःचा इतिहास, वारसा आणि महानायकांचा स्वाभिमानाने गौरव करत आहे. हा राष्ट्रीय चेतनेतील महत्त्वाचा बदल असल्याचे त्यांनी सांगितले.

१५ नोव्हेंबर २०२१ पासून सुरू झालेला जनजातीय गौरव दिन आज राष्ट्रीय उत्सव बनला आहे. भगवान बिरसा मुंडा यांचे जीवन, संघर्ष आणि त्याग देशासाठी प्रेरणादायी असून, त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन विकसित भारताचे स्वप्न साकार करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन मोदी यांनी केले.

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे तीन हजार कोटी रुपये खर्चाच्या २४६ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये १७३ प्रकल्पांचे उद्घाटन, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ३८ एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत १०० बहुउद्देशीय केंद्रांचा समावेश आहे. तसेच १९ नवीन एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि आदिवासी उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी १२ बहुउद्देशीय विपणन केंद्रांचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पांमुळे आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांना बळ मिळणार आहे.



३ हजार कोटींची २४६ विकासकामे; शिक्षण आणि रोजगाराला बळ

या कार्यक्रमाच्या माध्यमातून सुमारे ३ हजार कोटी रुपये खर्चाच्या २४६ विकासकामांचे उद्घाटन आणि भूमिपूजन करण्यात आले. यामध्ये १७३ प्रकल्पांचे उद्घाटन, आदिवासी विद्यार्थ्यांसाठी ३८ एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि प्रधानमंत्री जनजातीय आदिवासी न्याय महाअभियानांतर्गत १०० बहुउद्देशीय केंद्रांचा समावेश आहे. याशिवाय १९ नवीन एकलव्य मॉडेल निवासी शाळा आणि आदिवासी उत्पादकांना बाजारपेठ उपलब्ध करून देण्यासाठी १२ बहुउद्देशीय विपणन केंद्रांचे भूमिपूजन करण्यात आले. या प्रकल्पांमुळे आदिवासी भागातील शिक्षण, आरोग्य, रोजगार आणि पायाभूत सुविधांना चालना मिळण्याची अपेक्षा आहे.



आदिवासी समाजाच्या योगदानाचा गौरव

देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर आदिवासी समाजातील कन्या द्रौपदी मुर्मू विराजमान असल्याचा अभिमान संपूर्ण देशाला असल्याचे मोदी यांनी नमूद केले. आदिवासी समाजाचे योगदान केवळ देशाच्या इतिहासापुरते मर्यादित नसून भारताच्या वर्तमान आणि भविष्याच्या जडणघडणीतही महत्त्वपूर्ण असल्याचे त्यांनी अधोरेखित केले. दीर्घकाळ विकासापासून दूर राहिलेल्या भागांमध्ये केंद्र सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. देशातील १०० हून अधिक आकांक्षी जिल्हे आणि ५०० हून अधिक आकांक्षी तालुक्यांमध्ये विशेष विकास अभियान राबविण्यात आल्याचेही त्यांनी सांगितले.

आदिवासी समाजातील कन्या द्रौपदी मुर्मू देशाच्या सर्वोच्च घटनात्मक पदावर विराजमान असल्याचा प्रत्येक भारतीयाला अभिमान आहे. आदिवासी समाजाचे योगदान केवळ इतिहासापुरते मर्यादित नसून देशाच्या वर्तमान आणि भविष्याच्या जडणघडणीतही महत्त्वपूर्ण आहे, असे मोदी यांनी सांगितले.

दीर्घकाळ विकासापासून वंचित राहिलेल्या भागांच्या प्रगतीसाठी केंद्र सरकारने विशेष लक्ष केंद्रित केले आहे. देशातील १०० हून अधिक आकांक्षी जिल्हे आणि ५०० हून अधिक आकांक्षी तालुक्यांमध्ये विशेष विकास अभियान राबविण्यात येत आहे. या माध्यमातून दुर्गम भागातील नागरिकांना विकासाच्या मुख्य प्रवाहात आणण्याचा प्रयत्न सुरू असल्याचे त्यांनी स्पष्ट केले.

भगवान बिरसा मुंडा यांच्या जयंतीचा दिवस केवळ त्यांच्या स्मृतींना अभिवादन करण्यापुरता मर्यादित नसून, त्यांच्या विचारांनुसार राष्ट्रनिर्मितीचा संकल्प करण्याचा दिवस आहे. आदिवासी अस्मितेचा सन्मान, सांस्कृतिक वारशाचे जतन, गरिबी निर्मूलन आणि नक्षलवादाचा बीमोड करून विकसित भारताचे ध्येय साध्य करण्यासाठी देशाने एकजुटीने पुढे यावे, असे आवाहन पंतप्रधान मोदी यांनी केले.

परकीय दृष्टिकोनाऐवजी स्वकीय इतिहासाचा अभिमान!

आपल्या भाषणात मोदी म्हणाले की, पूर्वी देशातील अनेक दिवस आणि उत्सव परकीय दृष्टिकोनातून निश्चित केले जात होते. मात्र, आज भारत स्वतःचा वारसा, इतिहास आणि महानायकांना स्वाभिमानाने स्मरण करत आहे. राष्ट्रीय चेतनेमध्ये झालेला हा मोठा बदल आहे. १५ नोव्हेंबर २०२१ पासून सुरू झालेला जनजातीय गौरव दिन आज राष्ट्रीय उत्सवाचे स्वरूप धारण करत असल्याचेही त्यांनी सांगितले. भगवान बिरसा मुंडा यांचे जीवन, त्यांचा संघर्ष आणि त्याग देशासाठी प्रेरणादायी असल्याचे सांगत, त्यांच्या विचारांतून प्रेरणा घेऊन विकसित भारताचे स्वप्न पूर्ण करण्यासाठी प्रत्येकाने योगदान द्यावे, असे आवाहन मोदी यांनी केले.

स्वीकृत सदस्य निवड प्रक्रिया थंडावली

महापालिकेची प्रभाग समित्यांवर स्वयंसेवी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना संधी

महाईन्यूज । पुणे

शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे लांबणीवर पडलेली पुणे महापालिकेच्या प्रभाग समित्यांवरील स्वीकृत सदस्य निवडीची प्रक्रिया अद्याप रखडली आहे. दिवाळी सण संपत आला तरी निवडीबाबत ठोस हालचाल झालेली नसल्याने इच्छुक उमेदवारांची प्रतीक्षा कायम आहे. आता आगामी प्रभाग समितीच्या बैठकीत निवड प्रक्रिया पूर्ण होणार असल्याची माहिती सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे यांनी दिली.



पुणे महापालिकेने प्रभाग समित्यांवर स्वयंसेवी आणि सामाजिक संस्थांच्या प्रतिनिधींना संधी देण्यासाठी ऑगस्ट महिन्यात निवड प्रक्रिया सुरू केली होती. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयांतर्गत तीन प्रभाग समित्यांमधील तीन जागांसाठी ५२ इच्छुकांनी अर्ज खरेदी केले होते. त्यापैकी २५ जणांनी अर्ज सादर केले असून, २२ उमेदवारांचे अर्ज पात्र ठरले आहेत. महापालिका निवडणुकीत उमेदवारी न मिळालेल्या राजकीय कार्यकर्त्यांसह सामाजिक क्षेत्रातील संस्थांच्या प्रतिनिधींनीही या संधीसाठी अर्ज केले आहेत. महापालिका अधिनियमातील तरतुदींनुसार शहरातील १५ प्रभाग समित्यांवर एकूण ४५ प्रतिनिधींची नियुक्ती केली जाणार आहे.

उच्च न्यायालयाच्या २०१९ मधील निर्देशांनंतर या प्रक्रियेत सामाजिक आणि स्वयंसेवी क्षेत्रातील प्रत्यक्ष योगदानाला महत्त्व देण्याची अपेक्षा आहे. धनकवडी-सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाकडून अर्जांची छाननी करून पात्र उमेदवारांची यादी संबंधित प्रभाग समितीसमोर मतदानासाठी ठेवण्याचे नियोजन होते. मात्र, शिक्षक व पदवीधर मतदारसंघाच्या निवडणुकीची आचारसंहिता लागू झाल्याने निवड प्रक्रिया थांबली. आचारसंहिता संपल्यानंतरही निवडीला मुहूर्त मिळालेला नाही. आता आगामी प्रभाग समितीच्या बैठकीत अध्यक्षांच्या अध्यक्षतेखाली निवड प्रक्रिया पार पडणार असल्याचे प्रशासनाने स्पष्ट केले आहे. त्यामुळे इच्छुक उमेदवारांचे लक्ष या बैठकीकडे लागले आहे.

स्वीकृत सदस्यांच्या निवडीची आवश्यक प्रशासकीय प्रक्रिया या कार्यालयाकडून पूर्ण करण्यात आली आहे. पदवीधर आणि शिक्षक मतदारसंघाच्या निवडणुकीच्या आचारसंहितेमुळे पात्र सदस्यांची निवड प्रक्रिया पार पाडता आली नव्हती. तथापि, आता आगामी प्रभाग समितीच्या बैठकीत अध्यक्ष महोदयांच्या अध्यक्षतेखाली सदर निवड प्रक्रिया पूर्ण केली जाईल, असे धनकवडी सहकारनगर क्षेत्रीय कार्यालयाच्या सहाय्यक आयुक्त सुरेखा भणगे यांनी म्हंटले आहे. महानगरपालिका प्रभाग समिती सदस्यपदाची निवड प्रक्रिया गेल्या तीन महिन्यांपासून रखडलेली असणे ही लोकशाही प्रक्रियेसाठी दुर्दैवी बाब आहे. प्रशासनाने तातडीने निवड प्रक्रिया पूर्ण करून प्रभागातील नागरिकांच्या प्रश्नांना न्याय द्यावा.

चाकणला स्वतंत्र महापालिका? अजितदादांनंतर सुनेत्रा पवार यांच्याकडूनही संकेत

महाईन्यूज । पुणे

पुण्यातून गुवाहाटीला जाणाऱ्या इंडिगो विमानाच्या लँडिंग गिअरमध्ये (अंडरकॅरेज) बिघाड झाल्याने रविवारी (१५ नोव्हेंबर) पुणे विमानतळावर काही काळ तणावाचे वातावरण होते. दरम्यान, हे विमान सकाळी नऊ वाजून चार मिनिटांनी पुन्हा पुणे विमानतळावर उतरवण्यात आल्याने सर्व १९२ प्रवासी आणि कर्मचारी सुखरूप असल्याचे पुणे विमानतळ प्रशासनाकडून कळविण्यात आले आहे.



धावपट्टीवरून लो पास

सावधगिरीचा उपाय म्हणून इंडिगोच्या या विमानाने आधी धावपट्टीवरून लो पास घेतला. त्यामुळे पायलटला लँडिंग गिअरची नेमकी स्थिती पाहता येणे शक्य होते. सुरक्षेच्या सर्व उपाययोजनांची तपासणी केल्यानंतर पुणे या विमानाचे पुणे विमानतळावरच पुन्हा लँडिंग करण्यात आले.लँडिंगनंतर विमानाला तीन अग्निशमन गाड्या आणि दोन रुग्णवाहिकांच्या ताफ्यात 'बे-नंबर ७'वर नेण्यात आले. विमान आणि प्रवासी सुरक्षित असल्याची खात्री झाल्यानंतर सकाळी नऊ वाजून १० मिनिटांनी एटीसीकडून जाहीर करण्यात आलेली आपत्कालीन परिस्थिती मागे घेत असल्याचे जाहीर केले. त्यानंतर विमानातील सर्व प्रवाशांना सुखरूप खाली उतरवण्यात आले.

इंडिगो कंपनीच्या ६-ई-०६२३ (व्हीटी-आयझेडई) विमानाने पुणे विमानतळावरून गुवाहाटीकडे रविवारी सकाळी उड्डाण केले. टेकऑफनंतर लँडिंग गिअर आत (रिट्रॅक्ट) जाणे अपेक्षित असते. या वेळी मात्र इंडिगोच्या विमानाचे लँडिंग गेअर बाहेरच अडकून राहिले. टेकऑफ झाल्यानंतर थोड्याच वेळात विमानाच्या लँडिंग गिअरमध्ये बिघाड झाल्याचे पायलटच्या लक्षात आले. पायलटने ही माहिती तातडीने एअर ट्रॅफिक कंट्रोलला (एटीसी) दिली.

विमानाच्या लँडिंग गेअरमध्ये बिघाड झाल्याची माहिती मिळताच पुणे विमानतळ प्रशासन, एटीसी, इंडिगो आणि संबंधित यंत्रणांनी तातडीने सुरक्षा उपाययोजनांसाठी प्रयत्न सुरु केले. भारतीय हवाई दलाने (आयएएफ) संपूर्ण विमानतळावर आपत्कालीन परिस्थिती जाहीर केली. त्यानंतर अग्निशमन दल, रुग्णवाहिका आणि इतर आपत्कालीन पथकांना सज्ज ठेवण्यात आले.

इंडिगोच्या या विमानात प्रवासी आणि कर्मचारी मिळून १९२ जण होते. सर्वजण सुखरूप असून, कोणालाही दुखापत झाली नसल्याचे विमानतळ प्रशासनाने स्पष्ट केले आहे. अडकलेल्या प्रवाशांच्या पुढील प्रवासासाठी इंडिगोने बंगळुरूहून पुण्याला पर्यायी विमान पाठवण्याची व्यवस्था केली आहे. त्या विमानाने प्रवासी गुवाहाटीला रवाना होणार असल्याचेही कळविण्यात आले आहे.दरम्यान, पुणे विमानतळ प्रशासनाने भारतीय हवाई दल, एटीसी, इंडिगो आणि इतर यंत्रणांच्या समन्वयातून ही संपूर्ण मोहीम यशस्वीपणे पार पाडली. प्रवाशांच्या सुरक्षिततेला सर्वोच्च प्राधान्य देण्यात आल्याचे प्रशासनाने सांगितले.

या घटनेमुळे पुणे विमानतळावर काही काळ तणावपूर्ण वातावरण निर्माण झाले होते. मात्र, वैमानिकाने प्रसंगावधान राखत एटीसीशी योग्य समन्वय साधल्याने मोठा अनर्थ टळला. आपत्कालीन यंत्रणांनी तत्परतेने प्रतिसाद देत विमानातील सर्व प्रवाशांच्या सुरक्षिततेची खात्री केली. विमानातील तांत्रिक बिघाडाचे नेमके कारण शोधण्यासाठी पुढील तपासणी आणि तांत्रिक तपासणी प्रक्रिया केली जाण्याची शक्यता आहे.

सात जागा, दीडशे दावेदार; भाजपमध्ये स्वीकृतपदासाठी रस्सीखेच!

शुक्रवारी महापालिकेच्या सभेत निवडीचा फैसला होण्याची शक्यता

राष्ट्रवादीची तीन नावे आधीच सादर, साडेनऊ महिन्यांपासून नियुक्त्या रखडल्या

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

पिंपरी-चिंचवड महापालिकेतील स्वीकृत नगरसेवकांच्या दहा जागांची निवड गेल्या अनेक महिन्यांपासून रखडली आहे. वारंवार सर्वसाधारण सभा तहकूब होत असल्याने इच्छुकांची प्रतीक्षा लांबत चालली आहे. भाजपच्या वाट्याला आलेल्या सात जागांवरील नावांबाबत पक्षांतर्गत एकमत होत नसल्याची चर्चा आहे. दरम्यान, येत्या शुक्रवारी (दि. २०) होणाऱ्या सर्वसाधारण सभेत तरी निवडीचा विषय मार्गी लागणार का, याकडे इच्छुकांचे लक्ष लागले आहे.



> महापालिकेची शुक्रवारी सर्वसाधारण सभा होणार आहे. या सभेतील सर्व विषय मार्गी लावण्यात येणार असून, स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रियाही राबविण्यात येणार आहे.
>
> - प्रशांत शितोळे
> (सत्तारूढ पक्षनेते)

पिंपरी-चिंचवड महापालिकेत दुसऱ्यांदा भाजपची सत्ता स्थापन झाली. ६ फेब्रुवारीपासून नगरसेवकांचा कारभार सुरू झाला. सुमारे साडेनऊ महिन्यांत दहा सर्वसाधारण सभा झाल्या; मात्र स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीचा निर्णय झालेला नाही. ३० ऑक्टोबर रोजी होणारी तहकूब सभाही पुन्हा तहकूब करण्यात आली. आता २० नोव्हेंबर रोजी दोन तहकूब सभा आणि एका मासिक सभेचे आयोजन करण्यात आले आहे. त्यामुळे या सभांमध्ये निवडीचा विषय मार्गी लागणार का, याबाबत उत्सुकता आहे.

महापालिकेतील संख्याबळानुसार भाजपच्या वाट्याला सात, तर राष्ट्रवादी काँग्रेस (अजित पवार गट) पक्षाच्या वाट्याला तीन स्वीकृत नगरसेवकपदे येणार आहेत. राष्ट्रवादी काँग्रेसने आपल्या कोट्यातील तिन्ही इच्छुकांची नावे यापूर्वीच सादर केली आहेत. त्यासंबंधीचा प्रस्ताव सभागृहाच्या पटलावर आहे. मात्र, भाजपच्या सात जागांसाठी कोणाची निवड करायची, यावर अद्याप एकमत झालेले नसल्याचे सांगितले जात आहे.

स्वीकृत नगरसेवकांच्या निवडीचा विषय वारंवार पुढे ढकलल्याने कायदेशीर पेच निर्माण होण्याची शक्यता आहे. विषय दप्तरी दाखल झाल्यानंतर तीन महिन्यांनी तो पुन्हा सभेपुढे घेता येतो. तसेच फेरप्रस्ताव सादर करण्याची सूचनाही करण्यात आली होती. मात्र, महापौर रवि लांडगे यांनी त्यापूर्वीच पत्र दिले होते. संबंधित विषय तीन महिन्यांपूर्वी विषयपत्रिकेवर आला असून, तो तीन वेळा तहकूबही झाला आहे. त्यामुळे आता निवड प्रक्रिया नेमकी कोणत्या पद्धतीने राबविली जाणार, याकडे लक्ष लागले आहे.

भाजपकडे स्वीकृत नगरसेवकपदासाठी दीडशेपेक्षा अधिक इच्छुक असल्याची चर्चा आहे. यामध्ये माजी नगरसेवक, निवडणुकीत पराभूत झालेले उमेदवार, माघार घेतलेले इच्छुक, पक्षाचे पदाधिकारी आणि निष्ठावंत कार्यकर्त्यांचा समावेश आहे. राष्ट्रीय स्वयंसेवक संघ, हिंदुत्ववादी संघटना, बजरंग दल तसेच कामगार संघटनांशी संबंधित पदाधिकाऱ्यांनीही या पदासाठी प्रयत्न सुरू केले आहेत. इच्छुकांनी शहराध्यक्ष, महापौर आणि आमदारांकडे पाठपुरावा केला आहे. काहींनी थेट मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्याकडेही दावेदारी मांडल्याची चर्चा आहे. इच्छुकांची मोठी संख्या आणि पक्षांतर्गत स्पर्धेमुळे अंतिम सात नावांवर शिक्कामोर्तब करण्याचे आव्हान भाजपसमोर आहे.

महापालिकेची शुक्रवारी सर्वसाधारण सभा होणार आहे. या सभेतील सर्व विषय मार्गी लावण्यात येणार असून, स्वीकृत नगरसेवकांच्या नियुक्तीची प्रक्रियाही राबविण्यात येणार आहे, अशी माहिती सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे यांनी दिली. त्यामुळे शुक्रवारी प्रत्यक्ष निवड प्रक्रिया पूर्ण होणार की पुन्हा प्रतीक्षा करावी लागणार, हे सभेनंतरच स्पष्ट होईल.

दिवाळीच्या आतषबाजीने कचऱ्याचा डोंगर; सात दिवसांत ९,६९५ टन कचरा!

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

दिवाळीच्या सणामुळे पिंपरी-चिंचवड शहरातील कचऱ्याच्या प्रमाणात मोठी वाढ झाली आहे. फटाक्यांचे अवशेष, मिठाईचे बॉक्स, भेटवस्तूंचे पॅकिंग, थर्माकोल आणि खरेदीतून निर्माण होणाऱ्या कचऱ्यामुळे कचऱ्याचे वजन वाढले. दिवाळीच्या सात दिवसांत शहरातून तब्बल ९ हजार ६९५.४५ टन कचरा संकलित करण्यात आला. हा सर्व कचरा मोशी येथील कचरा डेपोत जमा करण्यात आला आहे. सणासुदीच्या काळात कचऱ्याचे प्रमाण वाढले असले, तरी दैनंदिन स्वच्छतेच्या माध्यमातून शहर स्वच्छ ठेवण्यात आल्याचा दावा महापालिका प्रशासनाने केला आहे.



सणासुदीतही स्वच्छतेचा जागर!

दिवाळीच्या सात दिवसांत शहरात ९,६९५.४५ टन कचरा जमा झाला. फटाके, मिठाईचे बॉक्स, भेटवस्तूंचे पॅकिंग यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढले. मात्र, सणाच्या सुट्या बाजूला ठेवून महापालिकेच्या स्वच्छता कर्मचाऱ्यांनी रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक ठिकाणे स्वच्छ ठेवण्यासाठी विशेष मेहनत घेतली.

सणासुदीच्या काळात शहरात दरवर्षी कचऱ्याचे प्रमाण वाढते. गणेशोत्सव आणि नवरात्रोत्सवातही कचऱ्याचे प्रमाण वाढले होते. दिवाळीत मात्र फटाक्यांच्या आतषबाजीमुळे कागद, फटाक्यांचे बॉक्स आणि अन्य अवशेष मोठ्या प्रमाणात निर्माण होतात. याशिवाय कपडे, इलेक्ट्रॉनिक वस्तू आणि अन्य साहित्याच्या खरेदीमुळे पॅकिंगचे कागद, पुठ्ठे, थर्माकोल यांचा कचरा वाढतो. मिठाईचे बॉक्स आणि भेटवस्तूंच्या पॅकिंगचीही त्यात भर पडते. त्यामुळे सात दिवसांत कचऱ्याचे एकूण वजन ९ हजार ६९५.४५ टनांवर पोहोचले.

शहरातील कचरा संकलन आणि वाहतुकीचे काम दोन ठेकेदारांमार्फत केले जाते. संकलित कचरा मोशी येथील कचरा डेपोत नेण्यात आला. सणासुदीच्या काळात कचरा वाढत असल्याने त्याचे नियमित संकलन आणि वाहतूक करण्याचे आव्हान महापालिकेसमोर होते.

महापालिकेच्या अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी दिवाळीच्या सुट्या न घेता स्वच्छतेचे काम सुरू ठेवले. रस्ते, पदपथ आणि सार्वजनिक ठिकाणी साचलेला कचरा नियमित उचलण्यात आला. रस्त्यांच्या कडेला तसेच पदपथांवर टाकलेल्या कचऱ्याच्या पिशव्या रात्रीच्या वेळी उचलण्यासाठी स्वतंत्र पथके तैनात करण्यात आली होती. उघड्यावर कचरा टाकणाऱ्यांवर दंडात्मक कारवाईही करण्यात येत आहे. त्यामुळे कचऱ्याचे प्रमाण वाढूनही शहरातील स्वच्छता राखण्यात यश आल्याचे प्रशासनाचे म्हणणे आहे.

दिवाळीच्या काळात फटाक्यांमुळे निर्माण झालेला कचरा तातडीने उचलण्यात आला. रस्त्यांवर जमा झालेला कचरा हटवून नियमित स्वच्छतेवर भर देण्यात आला. सणाच्या काळातही अधिकारी आणि कर्मचाऱ्यांनी शहर स्वच्छ ठेवण्यासाठी काम केले, अशी माहिती महापालिकेच्या आरोग्य विभागाचे उपायुक्त डॉ. प्रदीप ठेंगल यांनी दिली.

भूमिका

प्रदूषणाचा भस्मासुर; निरोगी जगण्याला ग्रहण!

मानवी जीवनाचा आधार असलेली शुद्ध हवा, स्वच्छ पाणी आणि हिरवागार निसर्ग आज प्रदूषणाच्या विळख्यात सापडला आहे. विकासाच्या नावाखाली निसर्गसंपत्तीचा अमर्याद उपभोग घेताना आपण पर्यावरणाचा समतोल बिघडवत आहोत. प्रगतीची शिखरे गाठण्याच्या प्रयत्नात निरोगी जगण्याचा पायाच कमकुवत होत असल्याचे वास्तव दुर्लक्षित करून चालणार नाही.



प्रदूषणाचे संकट आता केवळ पर्यावरणापुरते मर्यादित राहिलेले नाही, तर मानवी आरोग्य आणि भविष्यातील अस्तित्वापुढे गंभीर आव्हान उभे करत आहे.

नुकत्याच झालेल्या दिवाळीनंतर महाराष्ट्रातील अनेक शहरांमधील हवेची गुणवत्ता धोकादायक पातळीवर पोहोचल्याचे चित्र समोर आले. पुण्याचा हवा गुणवत्ता निर्देशांक (एक्यूआय) ४३२ पर्यंत पोहोचला, तर मुंबई, अकोला, नाशिक आणि कोल्हापूरमध्येही प्रदूषणाची पातळी वाढली. हे आकडे केवळ अहवालातील नोंदी नसून आपण घेत असलेल्या प्रत्येक श्वासासोबत शरीरात प्रवेश करणाऱ्या विषारी घटकांचा इशारा आहेत. वाहनांची वाढती संख्या, बांधकामांमधील धूळ, औद्योगिक उत्सर्जन, कचरा जाळणे आणि फटाक्यांची आतषबाजी ही प्रदूषणाची प्रमुख कारणे आहेत. हवेतील सूक्ष्म धूलिकणांमुळे दमा, फुप्फुसांचे विकार आणि हृदयविकारांचा धोका वाढतो. लहान मुले आणि ज्येष्ठ नागरिकांना याचा सर्वाधिक त्रास सहन करावा लागतो.

हवेच्या प्रदूषणाबरोबरच ध्वनिप्रदूषणाची समस्याही गंभीर बनली आहे. सण-उत्सव, मिरवणुका आणि सार्वजनिक कार्यक्रमांमधील कर्णकर्कश आवाजामुळे नागरिकांच्या आरोग्यावर परिणाम होत आहे. उत्सव साजरे करण्याचा अधिकार प्रत्येकाला आहे; मात्र दुसऱ्यांच्या आरोग्याची आणि शांततेची किंमत मोजून नव्हे, याचे भान ठेवणे आवश्यक आहे. प्रदूषण रोखण्यासाठी प्रशासनाने केवळ नियम आणि सूचना जारी करून चालणार नाही. बांधकामांच्या ठिकाणी धूळ नियंत्रण, रस्त्यांची नियमित स्वच्छता, सार्वजनिक वाहतुकीला प्रोत्साहन, कचरा जाळणाऱ्यांवर कारवाई आणि औद्योगिक उत्सर्जनावर कठोर नियंत्रण आवश्यक आहे. त्याचबरोबर शहरातील विविध भागांत हवा गुणवत्ता मोजणारी केंद्रे वाढवून प्रदूषणाच्या स्रोतांचा शास्त्रीय अभ्यास केला पाहिजे. महापालिका, प्रदूषण नियंत्रण मंडळ आणि अन्य यंत्रणांमध्ये समन्वय असणेही गरजेचे आहे.

मात्र, पर्यावरण रक्षणाची संपूर्ण जबाबदारी प्रशासनावर ढकलून नागरिकांना मोकळे होता येणार नाही. खासगी वाहनांचा अनावश्यक वापर टाळणे, कचरा न जाळणे, वृक्षारोपण आणि वृक्षसंवर्धन करणे, फटाक्यांचा वापर मर्यादित ठेवणे अशा छोट्या कृतींतून मोठा बदल घडू शकतो. पर्यावरण संवर्धन ही केवळ जनजागृतीची मोहीम न राहता ती प्रत्येकाच्या जीवनशैलीचा भाग बनली पाहिजे.

विकास आणि पर्यावरण यांच्यात संघर्ष निर्माण होण्याची गरज नाही. नियोजनबद्ध विकासातून दोन्हींचा समतोल साधता येऊ शकतो. हवामान बदल, वाढते तापमान, अनियमित पाऊस आणि नैसर्गिक आपत्तींची तीव्रता ही निसर्गाच्या बिघडलेल्या चक्राची गंभीर चिन्हे आहेत. त्यामुळे आज घेतलेले पर्यावरणपूरक निर्णय उद्याच्या पिढ्यांचे भविष्य सुरक्षित करू शकतात. प्रदूषणाचा राक्षस रोखण्यासाठी शासनाची कठोर इच्छाशक्ती आणि नागरिकांची सक्रिय साथ या दोन्हींची आवश्यकता आहे. अन्यथा, विकासाच्या झगमगाटात निरोगी जगण्याचा प्रकाशच हरवून बसेल!

प्रासंगिक »

हरवलेला आरसा

एका गावात एक वृद्ध कुंभार राहत होता. तो सुंदर मडकी बनवायचा. त्याचा मुलगा मात्र नेहमी तक्रार करायचा की, आपली मडकी इतर कुंभारांच्या मडक्यांइतकी आकर्षक नाहीत.

एके दिवशी वडिलांनी त्याला एक आरसा दिला आणि म्हणाले, "यात स्वतःचा चेहरा पाह." मुलाने आरसा पाहिला.

वडील म्हणाले, "आता मडक्याकडे पाह. तुला त्यात काय दिसते?" मुलगा म्हणाला, "माझे प्रतिबिंब!" वडील हसून म्हणाले, "आपण जसे असतो, तसेच आपले काम दिसते.

दुसऱ्यांच्या कामातील सौंदर्य शोधण्यापेक्षा स्वतःतील कमतरता ओळखून सुधारणा करायला शिक." त्या दिवसापासून मुलाने तक्रारी करणे सोडले.

तो प्रत्येक मडके अधिक काळजीपूर्वक बनवू लागला. काही महिन्यांतच त्याच्या मडक्यांची गावभर प्रशंसा होऊ लागली.

- तात्पर्य : दुसऱ्यांशी तुलना करण्यापेक्षा स्वतःमध्ये सुधारणा करणे अधिक महत्त्वाचे असते.

राजकारणात सत्ता, नेतृत्व आणि विचारधारा यांचा संघर्ष नवा नाही. मात्र, प्रदीर्घ राजकीय कारकीर्दीत स्वतःची स्वतंत्र ओळख निर्माण केलेल्या नेत्यासमोर जेव्हा वैचारिक भूमिका आणि राजकीय अस्तित्व यांपैकी एकाची निवड करण्याची वेळ येते.

शरद पवारांसमोर वैचारिक कसोटी की सत्तेचे आव्हान?



तेव्हा त्याची खरी कसोटी लागते. राष्ट्रवादी काँग्रेसचे ज्येष्ठ नेते शरद पवार सध्या अशाच निर्णायक वळणावर उभे आहेत. १९७८ मध्ये वसंतदादा पाटील यांचे सरकार बाजूला करून मुख्यमंत्री झाल्यानंतर त्यांच्यावर झालेली टीका आजही राजकीय चर्चेत संदर्भ म्हणून पुढे येते. आता राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांच्या विलीनीकरणाची आणि भाजपशी जवळीक वाढण्याची चर्चा सुरू असल्याने त्यांच्या भूमिकेकडे पुन्हा लक्ष लागले आहे.

शरद पवार यांनी आयुष्यभर फुले-शाहू-आंबेडकर यांच्या विचारांचा वारसा जपल्याची भूमिका मांडली. भाजप आणि संघ परिवाराच्या विचारसरणीशी त्यांचे मतभेदही अनेकदा स्पष्ट झाले आहेत. अशा परिस्थितीत भाजपसोबत जाण्याचा निर्णय घेतल्यास त्यांच्या वैचारिक भूमिकेवर प्रश्न उपस्थित होऊ शकतात. त्यामुळे हा निर्णय केवळ सत्तेतील सहभागाचा न राहता त्यांच्या राजकीय विश्वासार्हतेचीही परीक्षा ठरणार आहे.

राष्ट्रवादीच्या दोन्ही गटांना एकत्र येण्याची राजकीय गरज असू शकते. एका बाजूला संघटनात्मक ताकद, तर दुसऱ्या बाजूला अनुभवी नेतृत्व, असे या समीकरणाचे स्वरूप आहे. अजित पवार यांच्या निधनानंतर त्यांच्या गटासमोर नेतृत्वाचे आव्हान उभे राहिले आहे. दुसरीकडे, शरद पवार यांच्या गटालाही राजकीय ताकद आणि कार्यकर्त्यांचे भवितव्य सुरक्षित करण्याची गरज आहे. त्यामुळे विलीनीकरणाची चर्चा केवळ भावनिक एकीकरणाची नसून राजकीय अस्तित्व टिकविण्याच्या गणिताचाही भाग आहे.

मात्र, विलीनीकरणासाठी भाजपची भूमिका महत्त्वाची ठरणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी दोन्ही गटांच्या विलीनीकरणाचा निर्णय संबंधित पक्षांनी घ्यायचा असला, तरी भाजपला विश्वासात घ्यावे लागेल, असे स्पष्ट केले आहे. याशिवाय, राष्ट्रवादीचे दोन्ही गट एकत्र आल्यास महायुतीतील सत्तेचे गणित बदलू शकते. त्यामुळे एकनाथ शिंदे यांच्या शिवसेनेची भूमिकाही महत्त्वाची असेल. मित्रपक्षांमधील समन्वय आणि सत्तेतील प्रभाव यांचा नव्याने विचार करावा लागेल.

अखेर शरद पवार यांच्यासमोरचा प्रश्न केवळ पक्षाच्या विलीनीकरणाचा नाही, तर राजकीय वारसा, पुढील पिढीचे नेतृत्व आणि वैचारिक बांधिलकी जपण्याचाही आहे. सत्ता मिळविणे ही राजकीय यशाची एक बाजू असते; मात्र विचारांशी असलेली निष्ठा टिकविणे ही नेतृत्वाची खरी कसोटी असते. त्यामुळे पवारांचा आगामी निर्णय त्यांच्या पक्षापुरता मर्यादित राहणार नाही, तर महाराष्ट्राच्या राजकारणाची पुढील दिशा आणि त्यांच्या प्रदीर्घ राजकीय कारकिर्दीचा वारसा निश्चित करणारा ठरणार आहे.

।। अभंगवाणी ।।



चाल केलासी मोकळा ।
बोल विठ्ठल वेळोवेळां ॥१॥

तुज पापचि नाहीं ऐसें ।
नाम घेतां जवळीं वसे ॥ध्रु.॥

- संत तुकाराम

महाईन्यूज हे डिजिटल वृत्तपत्र **संस्थापक-संपादक श्री. अधिकराव दिवे-पाटील** यांनी छत्रपती शिवाजी महाराज गोल मंडई, गाळा क्र. ७९/८०, संत तुकारामनगर, पिंपरी, पुणे-४११०१८ येथे पुणे विभागीय कार्यालयामधून प्रसिद्ध केले आहे. एमएसएमई नोंदणी क्रमांक : MH-26-0158827. या वृत्तपत्रात डिजीटल स्वरूपात मुद्रीत केलेले लेख, बातम्या तसेच लेखनाशी किंवा विचारांशी संस्थापक-संपादक सहमत असतीलच असे नाही.
मुख्य कार्यकारी संपादक : वैष्णव जाधव | वृत्त संपादक : अविनाश आदक. (सर्व बातम्यांची, लेखांची व लेखनाची जबाबदारी यांची राहील.) विशेष सूचना : हा अंक कोणत्याही प्रकारच्या प्रिंटसाठी नाही. गौरवापर केल्यास कायदेशीर कारवाई केली जाईल.

मुंबई गोवा महामार्गावर तुफान कोंडी

मुंबई-ठाण्याकडे परतणाऱ्या चाकरमान्यांचे हाल; कर्जत पळसदरी मार्गावरही वाहनांच्या रांगा

महाईन्यूज । मुंबई

अलिबाग – दिवाळीची सुटी संपवून मुंबई, ठाण्याकडे परतणाऱ्या चाकरमान्यांसह पर्यटकांना मुंबई-गोवा महामार्गावर वाहतूक कोंडीचा सामना करावा लागत आहे. माणगाव आणि इंदापूर परिसरात वाहनांच्या लांबच लांब रांगा लागल्याने प्रवाशांचे हाल होत आहेत. माणगाव शहरात मुंबईच्या दिशेने जाणाऱ्या मार्गिकेवर मोठी वाहतूक कोंडी निर्माण झाली आहे. माणगावची बाजारपेठ अरुंद असल्याने या परिसरात वाहनांची गर्दी झाल्यानंतर वाहतुकीचा वेग पूर्णपणे मंदावतो.



दिवाळीची सुटी संपवून परतीच्या प्रवासाला निघालेल्या चाकरमान्यांच्या वाहनांची संख्या वाढल्याने परिस्थिती अधिकच बिकट झाली आहे. माणगावप्रमाणेच इंदापूर परिसरातही मुंबईकडे जाणाऱ्या मार्गावर वाहनांच्या रांगा लागल्या आहेत. खासगी वाहने, पर्यटकांच्या गाड्या आणि अन्य वाहनांच्या गर्दीमुळे महामार्गावर वाहतुकीचा खोळंबा होत आहे. वाहतूक सुरळीत करण्यासाठी पोलिसांना रस्त्यावर उतरून कसरत करावी लागत असून, कोंडी फोडताना त्यांचीही दमछाक होत आहे.

दरम्यान, उद्या सोमवारपासून अनेक चाकरमान्यांना पुन्हा नियमित कामावर रुजू व्हायचे आहे. त्याचबरोबर शाळा सुरू होत असल्याने विद्यार्थ्यांसह पालकांनाही वेळेत मुंबई-ठाणे गाठण्याची घाई आहे. मात्र वाहतूक कोंडीमुळे प्रवासाचा वेळ वाढत असून प्रवाश्यांना मनस्ताप सहन करावा लागत आहे. दिवाळीच्या सुट्टीनंतर परतीच्या प्रवासानंतर रविवारी मोठ्या प्रमाणात वाहने रस्त्यावर येतील हे निश्चित होते. त्यामुळे माणगाव इंदापूर परिसरात गर्दीच्या ठिकाणी वाहतूक नियोजन करणे अपेक्षित होते. पण योग्य नियोजन न केल्याने या ठिकाणी वाहनांच्या रांगा लागल्याचे पहायला मिळाले. बेशिस्त वाहनचालक लेनची शिस्त पाळत नसल्याने, वाहतूक कोंडीची समस्या अधिकच बिकट होत असल्याचे दिसून येत होते.

दिवाळीच्या सुट्टीनिमित्ताने हजारो पर्यटक अलिबाग, नागाव, आक्षी, मुरुड, काशिद, नांदगाव, किहीम, आवास, वरसोली परिसरात दाखल झाले होते. सर्व पर्यटक रविवारी दुपारनंतर परतीच्या मार्गाला लागले. त्यामुळे महामार्गावर प्रचंड वाहतूक कोंडी झाली होती. ३० किलोमीटरचे अंतर पार करण्यासाठी दीड ते दोन तास लागत होते. वाहतुकीचे नियमन करतांना पोलिसांना प्रंचड महेनत घ्यावी लागत होती.

कर्जत पळसदरी मार्गावरही वाहनांच्या रांगा

कर्जत आणि माथेरान परिसरात सुट्टीसाजरा करण्यासाठी आलेले पर्यटक रविवारी संध्याकाळी परतीच्या मार्गावर होते. त्यामुळे कर्जत पळसदरी, कर्जत बदलापूर, कर्जत चौक मार्गावर वाहनांची संख्या दुपारनंतर अचानक वाढली. त्यामुळे या परिसरातही वाहतूक कोंडी निर्माण झाली होती. कर्जत चार फाटा परिसरात चहुबाजूंने वाहनांच्या चार ते पाच किलोमीटरच्या रांगा लागल्या होत्या. वाहतूक नियमन करणे कठीण झाले होते. अलिबाग वडखळ राष्ट्रीय महामार्गावरही दुपारनंतर वाहनांच्या रांगा लागल्या होत्या.

अदानी समूहाच्या तारळी प्रकल्पाबाबत सयाजी शिंदे यांचे गंभीर आक्षेप

महाईन्यूज । कराड

पाटण तालुक्यातील तारळी पंप स्टोरेज प्रकल्पातील पर्यावरणीय नियमभंग आणि आर्थिक तफावतीविरोधात 'सह्याद्री देवराई'चे प्रमुख, अभिनेते सयाजी शिंदे यांनी पोलिसांत तक्रार दाखल करत लढा तीव्र करण्याचा एल्गार पुकारला आहे. पाटण तालुक्यातील तारळी धरणावर सुरू असलेल्या अदानी कंपनीच्या तारळी पंप स्टोरेज प्रकल्पाच्या कामाची सयाजी शिंदे आणि व्याख्याते विवेकानंद पाटील आदींनी प्रत्यक्ष पाहणी केली.



या पाहणीदरम्यान, प्रकल्पासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्यांचा अभाव, मोठ्या प्रमाणावरील वृक्षतोड, विनापरवाना उत्खनन आणि पर्यावरणीय नियमांचे झालेले उल्लंघन उघडकीस आले. वनविभाग, शासन आणि स्थानिक प्रशासनाने या गंभीर प्रकाराकडे जाणीवपूर्वक दुर्लक्ष केल्याचा आरोप त्यांनी केला.

तारळी पंप स्टोरेज प्रकल्पाची मूळ किंमत ५ हजार ६७५ कोटी रुपये असताना, राज्य वन्यजीव संवर्धन निधीसाठी या प्रकल्पाची किंमत केवळ ५६ कोटी ७५ लाख रुपये इतकी अत्यंत कमी दाखवण्यात आली आहे. या प्रचंड आर्थिक तफावतीमुळे अदानी कंपनीने मोठी फसवणूक केल्याचा गंभीर मुद्दा समोर आला आहे. नॅशनल वाईल्ड लाईफ बोर्डाची कायदेशीर परवानगी न घेताच प्रकल्पाचे ८० टक्क्यांहून अधिक काम पूर्ण करण्यात आले असून, यामुळे 'सह्याद्री'च्या प्रदेशातील जैवविविधतेचे अतोनात नुकसान झाल्याचा आरोप शिंदेंनी केला आहे. पर्यावरणाचा हा विनाश आता खपवून घेतला जाणार नाही. चुकीच्या पद्धतीने सुरू असलेल्या या कामाविरोधात कायदेशीर पावले उचलत पोलिसांत तक्रार दाखल करण्यात आली असून ठेकेदार कंपनीने जनतेची फसवणूक थांबवावी, असा इशारा त्यांनी दिला. तर कोणताही अनुचित प्रकार घडू नये म्हणून उंब्रज पोलीस ठाण्याचे सहायक पोलीस निरीक्षक पंकज पवार यांनी चोख पोलीस बंदोबस्त तैनात केला होता.

या प्रकल्पामुळे परिसरातील नैसर्गिक जलस्रोत, वनसंपदा आणि वन्यजीवांच्या अधिवासावर दीर्घकालीन परिणाम होण्याची भीती व्यक्त करण्यात येत आहे. सह्याद्रीच्या पर्यावरणीय समतोलाला धक्का पोहोचल्यास त्याचे दुष्परिणाम भविष्यात संपूर्ण परिसराला भोगावे लागतील, असेही त्यांनी नमूद केले. प्रकल्पाच्या कामकाजाची सखोल चौकशी करून दोषी अधिकारी आणि संबंधित कंपनीवर कठोर कारवाई करण्याची मागणी करण्यात आली. तसेच सर्व आवश्यक कायदेशीर परवानग्या मिळेपर्यंत प्रकल्पाचे काम तातडीने थांबवावे, अशी भूमिका त्यांनी मांडली.

'सह्याद्री'तील २३ प्रकल्प हद्दपार करण्याचा निर्धार

विवेकानंद पाटील सभेदरम्यान, बोलताना म्हणाले की, हा प्रकल्प सह्याद्री व्याघ्र प्रकल्पाच्या परिसराजवळ असल्याने येथील वन्यजीव धोक्यात आले आहेत. शासनाने सह्याद्रीच्या पट्ट्यात प्रस्तावित केलेले सर्व २३ प्रकल्प जोपर्यंत पूर्णपणे मागे घेतले जात नाहीत, तोपर्यंत स्वस्थ बसणार नाही. गोरगरीब जनतेच्या घरांवर आणि पर्यावरणावर घाला घालणाऱ्या या धोरणाविरोधात नागरिकांनी कोणतीही फूट न पाडता एकजुटीने वज्रमूठ बांधली पाहिजे. या पाहणीदौऱ्यादरम्यान बाळासाहेब सपकाळ, ॲड. सिद्धेश पवार, सखाराम सपकाळ, नवनाथ माने, विठ्ठल खरात, भानुदास सावंत आणि राजाराम सपकाळ यांच्यासह परिसरातील शेतकरी व लोक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

अमित शाह यांनी राहुल गांधींना सुनावले

लक्षात ठेवा भारताला बदनाम करुन सत्ता मिळणार नाही; गांधींवर जोरदार टीका

महाईन्यूज । नवी दिल्ली

केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी महाराष्ट्रातील सहकार क्षेत्राच्या विकासाचा मुद्दा उपस्थित करतानाच काँग्रेसवर जोरदार टीका केली आहे. तर लोकसभेतील विरोधी पक्षनेते राहुल गांधी यांनाही खडे बोल सुनावले आहेत. पंतप्रधान नरेंद्र मोदींच्या नेतृत्वात ७० वर्षांनी देशात सहकार मंत्रालयाची स्थापना करण्यात आली. तसंच आपल्या भाषणात त्यांनी साखर कारखाने, डेअरी उद्योग त्याचसह सहकार क्षेत्रातील विकासाबाबत महत्त्वाच्या घोषणा केल्या.



महाराष्ट्र ही देशात सहकार चळवळीची सुरुवात करणारी भूमी आहे. त्यामुळे सहकार क्षेत्राच्या विकासाची सुरुवातही पुण्यातून होत असल्याचे अमित शाह यांनी नमूद केले. काँग्रेसच्या काळात शेतकरी केंद्रात स्वतंत्र सहकार मंत्रालयाची मागणी करत होते. मात्र त्यांची मागणी मान्य झाली नाही. नरेंद्र मोदी यांच्या नेतृत्वाखालील सरकारने स्वतंत्र सहकार मंत्रालय स्थापन करून सहकार क्षेत्राला स्वतंत्र व्यासपीठ दिले, असा दावा त्यांनी केला.

काँग्रेसच्या काळात अनेक साखर कारखाने बंद पडले. आता हे कारखाने पुन्हा सुरू करण्याचे प्रयत्न सुरू असल्याचे शाह यांनी सांगितले. सुमारे ११० एकर जागेत उभारण्यात येणाऱ्या कारखान्याच्या माध्यमातून डेअरी आणि साखर कारखान्यांसाठी लागणारी यंत्रसामग्री देशातच तयार केली जाणार आहे. हा प्रकल्प २०२९ पर्यंत सुरू करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी सांगितले. याशिवाय रेल्वे आणि संरक्षण क्षेत्रासाठी लागणारे कंटेनरही येथे तयार करण्याचे नियोजन असल्याचे त्यांनी स्पष्ट केले. त्यानंतर त्यांनी राहुल गांधींनाही खडे बोल सुनावले आहेत.

हैदराबाद या ठिकाणी काँग्रेसने भारत समिट २०२६ या कार्यक्रमाचं आयोजन केलं होतं. या कार्यक्रमात इटलीचे नेते जिकाकोमो फिलिबेक यांनी भाषण करताना राहुल गांधी यांचा नारा व्होट चोर गद्दी छोडचा नारा दिला. त्यानंतर भाजपा आक्रमक झाली आहे. आता अमित शाह यांनी जी टीका केली आहे त्या टीकेला काँग्रेसकडून उत्तर दिलं जाणार का? हे पाहणं महत्त्वाचं असणार आहे.


भारताला बदनाम करुन तुमची सत्ता येणार नाही

राहुल गांधी यांच्या उपस्थितीत एका इटालियन नेत्याने व्होट चोर गद्दी छोडचा नारा दिला. यानंतर किरेन रिजिजू यांच्या पाठोपाठ आता अमित शाह यांनीही राहुल गांधींवर टीका केली आहे. अमित शाह म्हणाले, "राहुल गांधी सातत्याने निवडणुका हरले आहेत. त्याचं नैराश्य आणि वैफल्य ते आंतरराष्ट्रीय संमेलनांमध्ये भारताच्या विरोधात वक्तव्यं करून काढत आहेत. भारताला बदनाम करुन तुम्हाला सत्ता मिळणार नाही हे लक्षात ठेवा" असं म्हणत अमित शाह यांनी राहुल गांधींना खडे बोल सुनावले आहेत.

अमेरिकेतील मियामी विमानतळावर दुर्घटना; धावपट्टीवर दोन विमानांची धडक

महाईन्यूज । मियामी

अमेरिकेमधील मियामी विमानतळावर शनिवारी रात्री एक दुर्घटना घडली आहे. मियामी विमानतळावरील धावपट्टीवर दोन विमानांची धडक झाली असून या घटनेत २ प्रवासी जखमी झाल्याची माहिती सांगितली जात आहे. पनामा सिटीहून आलेलं कोपा एअरलाइन्सचं एक प्रवासी विमान हे धावपट्टीवरून पुढे जात असताना त्या विमानाचा एक भाग शेजारी असलेल्या मालवाहू विमानाच्या पुढील भागाला धडकला आहे. त्यामुळे या घटनेनंतर मियामी विमानतळावर काही वेळ मोठा गोंधळ पाहायला मिळाला.



दरम्यान, अमेरिकेतील विमान वाहतूक सेवा संपूर्ण देशात काही काळासाठी थांबवण्यात आली होती, त्यामुळे आधीच अमेरिकेत गोंधळाची स्थिती निर्माण झाली होती. याचा फटका लाखो प्रवाशांना बसला होता आणि अनेक प्रवासी विमानतळांवर अडकून पडले होते. या घटनेच्या दुसऱ्या दिवशी मियामी विमानतळावर ही दुर्घटना घडली आहे.

शनिवारी रात्री ९:१५ च्या सुमारास ही घटना घडली आहे. जेव्हा पनामा सिटीहून १६६ प्रवासी आणि सहा कर्मचारी घेऊन येणारे कोपा एअरलाइन्सचं बोईंग ७३७ विमान धावपट्टीवरून जात होतं. मात्र, यावेळी त्या विमानाचा पंखा युपीएस (UPS) कंपनीच्या बोईंग ७६७ मालवाहू विमानाच्या पुढच्या भागावर आदळला. त्यामुळे एकच खळबळ उडाली. या घटनेत दोन व्यक्ती जखमी झाल्याची माहिती कोपा एअरलाईन्सने दिली. या संदर्भातील वृत्त एनडीटीव्हीने दिलं आहे.

दरम्यान, या विमान कंपनीने एका निवेदनात म्हटलं की, "विमान टर्मिनलवर पोहोचलं असून सर्व प्रवाशांना खाली उतरवण्यात आलेलं आहे. त्यापैकी दोन प्रवाशांना विमानतळावरील वैद्यकीय पथकाकडून उपचार देण्यात आले आहेत. प्राथमिक माहितीनुसार त्यांना किरकोळ दुखापत झालेली आहे. तसेच इतर प्रवासी आणि सहा कर्मचारी सुरक्षित असून त्यांची प्रकृती उत्तम असल्याचंही कंपनीने सांगितलं आहे.

या घटनेनंतर विमानतळ प्रशासन आणि संबंधित विमान कंपन्यांकडून तातडीने परिस्थितीचा आढावा घेण्यात आला. दोन्ही विमानांच्या नुकसानीची तपासणी करण्यासाठी तांत्रिक पथकाला पाचारण करण्यात आले. तसेच विमानांची हालचाल आणि धावपट्टीवरील सुरक्षेच्या नियमांबाबतही तपास सुरू करण्यात आला आहे. या अपघातामुळे विमानतळावरील विमान वाहतुकीवर काही काळ परिणाम होण्याची शक्यता व्यक्त करण्यात आली.

कंपनीने काय म्हटलं?

"ही घटना घडल्यामुळे प्रवाशांना झालेला त्रास आणि निर्माण झालेली चिंता याबद्दल आम्ही दिलगिरी व्यक्त करतो. प्रवासी आणि कर्मचारी यांची सुरक्षा ही आमची सर्वोच्च प्राथमिकता आहे. हे आम्ही पुन्हा स्पष्ट करतो. या प्रकरणाच्या चौकशीत आम्ही संबंधित अधिकाऱ्यांना पूर्ण सहकार्य करू", असं त्या विमान कंपनीने म्हटलं आहे. दरम्यान, मियामी विमानतळावर घडलेल्या या घटनेच्या आधी दोन महिन्यांपूर्वी देखील एक अपघाताची घटना घडली होती. मियामी आंतरराष्ट्रीय विमानतळावर अॅमेझॉनचं एक कार्गो विमान धावपट्टीवरून घसरलं होतं. या अपघातात पाच जणांचा मृत्यू झाला होता, तर पाच जण जखमी झाले होते.

'रामायण'ने मोडले 'ॲनिमल', 'गदर २' अन् 'दृश्यम ३'चे रेकॉर्ड

'रामायण'ने बुक माय शोवर एका दिवसात सर्वाधिक तिकीट विक्रीचा विक्रम केला आहे. एकाच दिवसात १६.६ लाख तिकिटे विकली गेली. याबरोबरत, पहिल्या सोमवारी सर्वाधिक कमाई करणारा बॉलीवूड चित्रपट ठरला आहे. 'रामायण' हा बुक माय शोवर सलग चार दिवस १० लाखांपेक्षा जास्त तिकिटे विकणारा सहावा भारतीय चित्रपट ठरला आहे. ॲडव्हान्स बुकिंगसह एकूण ५४,७६,००० तिकिटांची विक्री झाल्यामुळे, हा सिनेमा पहिल्याच आठवड्याच्या शेवटी सर्वाधिक कमाई करणाऱ्या चित्रपटांमध्ये रामायण तिसऱ्या क्रमांकावर आहे. बॉक्स ऑफिसच्या आकडेवारीनुसार, 'रामायण' हा चित्रपट प्रदर्शनाच्या पाचव्या दिवशी, भारतात एकाच दिवसात १०० कोटींची निव्वळ कमाई करणारा दुसरा बॉलिवूड चित्रपट ठरला आहे. यापूर्वी केवळ 'धुरंदर २: द




रिव्हेंज'ने हा विक्रम केला होता. सिनेमाने सहाव्या दिवशी भारतात ७८.२१ कोटींची निव्वळ कमाई केली. या चित्रपटाने 'गदर २'चा जवळपास ५५ कोटी रुपयांचा आधीचा विक्रम मागे टाकत, मंगळवारी सर्वाधिक कमाई करणाऱ्या हिंदी चित्रपटाचा नवा विक्रम केला आहे. सामान्यत: शनिवारी-रविवारी सिनेमांची कमाई ही तुलनेने जास्त होत असते. मात्र,या सिनेमाने सोमवारी ९५ कोटी, मंगळवारी ७८.२१ कोटी आणि बुधवारी ६१.१० कोटींची कमाई केली. याआधी कोणताही हिंदी सिनेमा सलग तीन दिवस इतकी कमाई करू शकला नाही. याबरोबरच, रामायणने पहिल्या सात दिवसांत फक्त हिंदी भाषेत ४०९.५६ कोटींची कमाई केली आहे. सर्व भाषांत मिळून नऊ दिवसांत सिनेमाने जगभरात ११११ कोटींचे कलेक्शन केले आहे.



श्रुती सोबत घडत होती विचित्र घटना

अभिनेत्री श्रुती हासन ही तिच्या अभिनयासोबतच स्पष्टवक्तेपणासाठीही ओळखली जाते. नुकत्याच दिलेल्या एका मुलाखतीत तिने मुंबईतील घरात आलेल्या एका विचित्र आणि भीतीदायक अनुभव शेअर केला. तिच्या घरात काहीतरी अजब घडत असल्याची जाणीव तिला सतत होत होती. अनेक उपाय करूनही परिस्थितीत फरक पडत नसल्याचे तिने सांगितले. नेहा धुपियाला दिलेल्या मुलाखतीत श्रुतीने हा अनुभव सांगितला. एखाद्या ठिकाणचे वातावरण सामान्य आहे की तिथे काहीतरी विचित्र आहे, याची जाणीव आपल्याला कधीकधी होते, असे तिने सांगितले. तिच्या चेन्नईतील घराचे वातावरण अतिशय शांत आहे. मात्र, मुंबईतील घरात राहायला सुरुवात केल्यापासूनच तिला तिथे काहीतरी विचित्र असल्याचे जाणवत होते. श्रुतीने सांगितले की, तिच्याकडे माणसाच्या आकाराचा एक मॅनक्विन होता. तिने त्याचे नाव 'फिओना' ठेवले होते. तिच्याकडे एक एस्ट्रा ड्रेस होता, जो कपाटात ठेवण्यासाठी जागा नव्हती. त्यामुळे तिने तो ड्रेस या मॅनक्विनला घातला होता. तिचे मित्र घरी आल्यावर नेहमी या फिओनाचे स्वागत करायचे. मात्र, काही दिवसांनी तिला एक विचित्र गोष्ट जाणवू लागली. रात्रीच्या वेळी हा मॅनक्विन आपली जागा बदलत असायचा. सुरुवातीला हा प्रकार नेमका कसा घडतोय आणि मॅनक्विनला कोण हलवत आहे, असा प्रश्न तिला पडला.



कपूर कुटुंबाची दिवाळी परंपरा आजही कायम!

बॉलिवूडमधील कपूर कुटुंबाची दिवाळी नेहमीच खास असते. एकत्र सण साजरा करणे, स्वादिष्ट पदार्थांची मेजवानी आणि कुटुंबातील सदस्यांना शगुन देण्याची परंपरा आजही या घराण्यात जपली जाते. ज्येष्ठ अभिनेत्री नीतू कपूर यांनी नुकत्याच एका मुलाखतीत कपूर कुटुंबाच्या दिवाळी उत्सवाच्या जुन्या आठवणींना उजाळा दिला. यावेळी त्यांनी आपल्या सासू आणि कपूर कुटुंबाच्या प्रमुख कृष्णा राज कपूर यांच्यासोबतच्या नात्याबद्दल एक भावूक आठवणही सांगितली. नीतू कपूर यांनी सांगितले की, "लग्नानंतर सुरुवातीच्या काळात कपूर कुटुंबात दिवाळी मोठ्या उत्साहात साजरी केली जायची. घरात जेवणासाठी अनेकदा बुफे पद्धतीची व्यवस्था असायची. संपूर्ण कुटुंबाने एकत्र जेवण करावे, असे त्यांचे सासरे राज कपूर यांना नेहमी वाटायचे. कुटुंबातील सर्व सदस्य एकत्र जेवताना पाहून त्यांना विशेष आनंद व्हायचा." यावेळी नीतू यांनी राज कपूर यांच्या आवडत्या पदार्थाचाही उल्लेख केला. 'खुरजाओ' नावाचा अंड्यासोबत तळलेला खास ब्रेड हा त्यांचा आवडता पदार्थ होता, असे त्यांनी सांगितले. आपल्या सासू कृष्णा राज कपूर यांच्याबद्दल बोलताना नीतू यांनी एक हृदयस्पर्शी प्रसंग सांगितला. दिवाळीच्या पूजेनंतर त्या अनेकदा चेंबूर येथील सासूबाईंच्या घरी जाऊन त्यांचे आशीर्वाद घेत असत. मात्र, एकदा कामाच्या व्यस्त वेळापत्रकामुळे नीतू आणि ऋषी कपूर यांना पूजेला उपस्थित राहता आले नाही. त्यामुळे ते दुसऱ्या दिवशी कृष्णा राज कपूर यांना भेटण्यासाठी गेले.

भारताचा न्यूझीलंडवर थरारक विजय!

अर्शदीप-सिराजची बॅटिंग ठरली टर्निंग पॉईंट; मालिकाही जिंकली, गोलंदाज ठरले हिरो

महाईन्यूज । तौरंगा

भारताने पाचव्या वनडे सामन्यात न्यूझीलंडचा २२ धावांनी पराभव केला. यासह पाच सामन्यांची वनडे मालिका भारताने ३-१ ने जिंकली आहे. टीम इंडियाने या अखेरच्या वनडे सामन्यात फक्त २०९ धावांवर सर्वबाद झाला होता, पण प्रत्युत्तरात न्यूझीलंड संघ फक्त १८७ धावांवर सर्वबाद झाला. भारताच्या गोलंदाजांनी उत्कृष्ट लाईन-लेंग्थसह कमालीची गोलंदाजी करत मोक्याच्या क्षणी गोलंदाजी केली. पण मोहम्मद सिराज व अर्शदीप सिंगने यांनी एक चौकार व ३ षटकारांसह केलेल्या २६ धावा सामन्याचा टर्निंग पॉईंट ठरल्या.



न्यूझीलंड संघाला विजयासाठी २२ चेंडूत २९ धावांची गरज असताना अक्षर पटेलने जेकब डफीला बाद करत किवी संघाला नववा धक्का दिला. यानंतर आता भारताला विजयासाठी एका विकेटची गरज होती. त्यानंतर ४९व्या षटकातील अक्षर पटेलच्या पहिल्याच चेंडूवर इशान किशनने ब्लेअर टिकनरला स्टंपिंग करत बाद केलं.

न्यूझीलंड संघाने सामन्याची नाणेफेक जिंकत भारताला फलंदाजीसाठी पाचारण केलं. न्यूझीलंडच्या भेदक गोलंदाजीसमोर भारताची टॉप फलंदाजी फळी फेल ठरली. रोहित शर्मा ७ धावा, विराट कोहली ५ धावा तर ऋतुराज गायकवाड १८ धावा करत बाद झाला. त्यानंतर श्रेयस अय्यरने २२ धावांचं योगदान दिलं. श्रेयस अय्यर व अक्षर पटेल यांनी ५२ धावांची भागीदारी रचली. अक्षर पटेल व इशान किशन दोघांनीही ४६-४६ धावांचं योगदान दिलं, पण दोघांचंही अर्धशतक हुकलं. यानंतर नमन धीरने २२ धावा केल्या.

भारताच्या धावसंख्येत अर्शदीप सिंगचे २ षटकार व मोहम्मद सिराजचा १ षटकार व एक चौकार लगावला. या दोघांनी १० चेंडूत २६ धावांचं योगदान दिलं आणि संघाला २०९ धावांपर्यंत नेलं.

'सर्वांनाच माहिती होतं!' सँडपेपर गेट प्रकरणात कमिन्सचा दावा खोटा ठरवला

महाईन्यूज । ऑस्ट्रेलिया

ऑस्ट्रेलियाच्या सँडपेपर गेट प्रकरणात होणारे खुलासे काही थांबायचं नाव घेत नाहीत. एकामागून एक खेळाडूंची समोर येणारी वक्तव्य या प्रकरणात कोण खरं आणि कोण खोटं या फरकाला अधिक बळकटी देणारा ठरत आहे. उस्मान ख्वाजा आणि पॅट कमिन्स यांच्यानंतर आता ऑस्ट्रेलियाचा माजी वेगवान गोलंदाज चॅड सायर्सनेही या प्रकरणाबाबत मोठा दावा केला आहे. चॅड सायर्स हा २०१८ मधील ऑस्ट्रेलियाच्या संघातील राखीव खेळाडू होता.



केपटाऊन कसोटीच्या वेळी ऑस्ट्रेलियाच्या संपूर्ण संघाला बॉल टेम्परिंग करण्याच्या प्रकाराची माहिती होती, असे सायर्सने म्हटलं आहे. त्यामुळे या प्रकरणावरून ऑस्ट्रेलियन क्रिकेटमध्ये पुन्हा एकदा आरोप-प्रत्यारोप सुरू झाले आहेत. दक्षिण आफ्रिकेविरुद्धच्या वादग्रस्त केपटाऊन कसोटीत सायर्स बारावा खेळाडू होता. या प्रकरणात कॅमेरून बॅनक्रॉफ्ट, डेव्हिड वॉर्नर आणि स्टीव्ह स्मिथ दोषी आढळले होते. सायर्सने या दौऱ्यात जोहान्सबर्ग येथे ऑस्ट्रेलियाकडून एकमेव कसोटी सामना खेळला होता.

पॅट कमिन्सने ड्रेसिंग रूममध्ये बॉल टेम्परिंग करण्याबाबत कोणतीही चर्चा झाली नव्हती, असा दावा केला होता. मात्र, सायर्सने त्याचं म्हणणं फेटाळलं. तो म्हणाला, "माझ्या म्हणण्यावर मी ठाम आहे. त्या संघातील प्रत्येकाला काय घडत होतं आणि कशाचा वापर केला जात होता, याची माहिती होती, असा माझा विश्वास आहे. मी कोणाचीही बाजू घेत नाही. या प्रकरणात मी तटस्थ आहे. जे घडलं आणि मला जे वाटतं, तेच सांगण्याचा माझा प्रयत्न आहे."

दरम्यान, उस्मान ख्वाजाने आपल्या आगामी आत्मचरित्रात संपूर्ण ऑस्ट्रेलियन संघाला सँडपेपरच्या वापराबाबत माहिती होती, असा दावा केला होता. त्यावर पॅट कमिन्सने प्रतिक्रिया देताना ख्वाजाचे आरोप 'पूर्णपणे निरर्थक' असल्याचं म्हटलं होतं. मात्र, कमिन्सने ख्वाजाला दिलेल्या उत्तराची पद्धत सायर्सला फारशी आवडली नाही. तो म्हणाला, "कमिन्सने उस्मानवर वैयक्तिक पातळीवर जाऊन टीका केली, ते मला आवडलं नाही. त्याने असं का केलं असेल, हे मला कदाचित समजू शकतं. मात्र, तसं करण्याची गरज नव्हती, असं मला वाटतं."

"या प्रकरणावर आधी बोलणं कठीण होतं", ऑस्ट्रेलियाचा माजी खेळाडूचं सँडपेपर गेट वादावर मोठं वक्तव्य

या संपूर्ण प्रकरणाबाबत आजपर्यंत मोकळेपणाने बोलता येत नव्हतं, अशी खंतही चॅड सायर्सने व्यक्त केली. तो म्हणाला, "हे सगळं खूप कठीण होतं. कारण या विषयावर बोलताना प्रत्येक शब्द जपून वापरावा लागत होता आणि खरं काय घडलं, हेही सांगता येत नव्हतं. त्यामुळे आता हे सर्व समोर आल्याने थोडा दिलासा मिळाला आहे."

सायर्सने पुढे सांगितलं की, त्या दक्षिण आफ्रिका दौऱ्याची त्याच्यासाठी खास आठवण असायला हवी होती. कारण या दौऱ्यानंतर त्याने कसोटी क्रिकेटमध्ये पदार्पण केलं होतं. मात्र, सँडपेपर गेट प्रकरणामुळे त्याच्या पदार्पणाऐवजी या वादाचीच अधिक चर्चा झाली. या घटनेनंतर ड्रेसिंग रूममध्ये खेळाडूंमध्ये जवळपास दीड तास चर्चा झाली होती. सायर्स म्हणाला, "त्या दिवसाचा खेळ संपल्यानंतर आम्ही सर्वजण ड्रेसिंग रूममध्ये एकत्र बसलो होतो. जवळपास ६० ते ९० मिनिटे आमची चर्चा सुरू होती. नेमकं काय घडलं, आता पुढे काय करायचं आणि या संपूर्ण प्रकरणाबाबत आपली भूमिका काय असणार, यावर आम्ही बोललो. आरोपांचे गांभीर्य पाहता अशी चर्चा होणं अपेक्षितच होतं. या परिस्थितीतून पुढे कसं जायचं, यावरही आम्ही विचार केला."

स्मार्ट PCMC
SMART CITY
महाईन्यूज™
epaper.mahaenews.com
ePaper
। सोमवार ।
दि. 16 नोव्हेंबर 2026 ।
पिंपरी-चिंचवड, मावळ आवृत्ती

आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त 'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' उपक्रम

लोकनेत्याच्या वाढदिनी लोकसेवेचा यज्ञ; तब्बल ५१ आदिवासी- दुष्काळग्रस्त गावांना माणुसकीचा आधार!

भाजपा प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते शुभारंभ; शुभेच्छांचे फलक, हार-तुरे आणि सत्काराला फाटा

खेड, जुन्नर, आंबेगावमधील गरजू कुटुंबांना महिनाभर पुरेल इतक्या जीवनावश्यक साहित्याचे वाटप

महाईन्यूज ।
पिंपरी-चिंचवड

वाढदिवस म्हटला की शुभेच्छांचे फलक, मोठमोठे होर्डिंग, हार-तुरे, सत्कार आणि विविध कार्यक्रमांचे आयोजन असे चित्र सर्वत्र पाहायला मिळते. मात्र, या पारंपरिक उत्सवाला सामाजिक बांधिलकीची जोड देत भाजपाचे आमदार महेश लांडगे यांच्या वाढदिवसानिमित्त एक सेवाभावी उपक्रम हाती घेण्यात आला आहे. 'लोकनेत्याच्या वाढदिनी लोकसेवेचा यज्ञ' या संकल्पनेतून पुणे जिल्ह्यातील ५१ आदिवासी गावांमधील गरजू कुटुंबांना मदतीचा हात देण्याचा संकल्प भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवडच्या वतीने केला आहे.

'एक हात मदतीचा... माणुसकीच्या नात्याचा!' या उपक्रमाचा शुभारंभ भारतीय जनता पार्टीचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्र चव्हाण यांच्या हस्ते करण्यात आला. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या संकल्पनेतून प्रेरणा घेत दुष्काळग्रस्त भागातील शेतकरी आणि आदिवासी पट्ट्यातील गरजू कुटुंबांना जीवनावश्यक साहित्याची मदत उपलब्ध करून देण्याचे नियोजन करण्यात आले आहे.

आमदार महेश लांडगे यांचा २७ नोव्हेंबर रोजी वाढदिवस आहे. या निमित्ताने कोणत्याही प्रकारची जाहिरातबाजी, शुभेच्छांचे फ्लेक्स, बॅनर किंवा होर्डिंग न लावता त्यासाठी होणारा खर्च गरजूंच्या मदतीसाठी वापरण्याचे आवाहन करण्यात आले आहे. वाढदिवसाचा आनंद केवळ कार्यकर्ते आणि समर्थकांपुरता मर्यादित न ठेवता समाजातील वंचित आणि गरजू घटकांपर्यंत पोहोचविण्याचा या उपक्रमामागील उद्देश आहे, अशी माहिती उपक्रमाचे समन्वयक तथा भाजपाचे सरचिटणीस विकास डोळस आणि संजय पटणी यांनी दिली.

या उपक्रमाच्या शुभारंभप्रसंगी भाजपा शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित घोडके, आमदार उमाताई खापरे, माजी आमदार अश्विनी जगताप, संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, उपक्रमाचे समन्वयक तथा सरचिटणीस विकास डोळस, सरचिटणीस मधुकर बच्चे, सरचिटणीस संजय पटणी, नगरसेवक निलेश नेवाळे, क प्रभाग अध्यक्ष निखिल बोराडे यांच्यासह आजी-माजी नगरसेवक, पक्षाचे पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी, हितचिंतक आणि परिवारातील सदस्य उपस्थित होते.

वाढदिवसाच्या खर्चातून गरजूंच्या घरात अन्नधान्य!

वाढदिवसानिमित्त होणाऱ्या अनावश्यक खर्चाला फाटा देऊन त्या निधीचा समाजोपयोगी कामासाठी विनियोग करण्याचा संदेश या उपक्रमातून देण्यात आला आहे. शुभेच्छांचे फलक, जाहिराती, सत्कार, सजावट आणि अन्य कार्यक्रमांवरील खर्च टाळून त्याऐवजी गरजू कुटुंबांना मदत करण्याचे आवाहन नगरसेवक, पदाधिकारी, कार्यकर्ते, सहकारी आणि हितचिंतकांना करण्यात आले आहे. या माध्यमातून राजकीय आणि सामाजिक क्षेत्रातील वाढदिवस साजरा करण्याच्या प्रचलित पद्धतीला विधायक पर्याय देण्याचा प्रयत्न करण्यात येत आहे. लोकप्रतिनिधींच्या माध्यमातून गावागावांत मदत पोहोचविण्याबरोबरच समाजातील दानशूर व्यक्तींनाही सेवाकार्यात सहभागी करून घेण्याचा मानस आहे.



"आमदार महेशदादा लांडगे यांनी आपल्या वाढदिवसाला सामाजिक उत्तरदायित्वाची जोड देत पक्षाच्या कार्यकर्त्यांसमोर एक आदर्श निर्माण केला आहे. 'एक नगरसेवक, एक गाव' ही केवळ घोषणा नसून प्रत्यक्ष कृतीतून लोकसेवा करण्याचा संकल्प आहे. पिंपरी-चिंचवडसारख्या औद्योगिक शहरातून आदिवासी आणि दुष्काळग्रस्त भागातील गरजू कुटुंबांसाठी मदतीचा हात पुढे जाणे, ही सामाजिक एकात्मतेची भावना अधिक बळकट करणारी बाब आहे. प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या हस्ते या उपक्रमाचा शुभारंभ झाल्याने कार्यकर्त्यांना नवी प्रेरणा मिळाली आहे. शहर भाजपाचे सर्व पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते या सेवाकार्यात सक्रिय सहभाग घेऊन प्रत्येक निवडलेल्या गावातील गरजू कुटुंबांपर्यंत मदत पोहोचविण्यासाठी कटिबद्ध आहेत. सेवाभाव हीच भारतीय जनता पार्टीच्या कार्याची खरी ओळख आहे."

- - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भारतीय जनता पार्टी, पिंपरी-चिंचवड, पुणे.

डिसेंबर २०२६ मध्ये मदतीचा दुसरा टप्पा

या उपक्रमाची व्याप्ती केवळ ५१ गावांपुरती मर्यादित राहणार नाही. डिसेंबर २०२६ च्या पहिल्या आठवड्यात सामाजिक संस्था, उद्योजक, व्यापारी, दानशूर व्यक्ती आणि नागरिकांच्या लोकसहभागातून आणखी दुष्काळग्रस्त गावांमध्ये मदतकार्य राबविण्याचे नियोजन आहे. उपक्रमांतर्गत मदत मिळालेल्या गावांची नावे, लाभार्थी कुटुंबांची संख्या, वितरित साहित्याचा तपशील, छायाचित्रे आणि व्हिडिओ यांचा स्वतंत्र अहवाल तयार करून भाजपा प्रदेश कार्यालयाकडे सादर करण्यात येणार आहे. त्यामुळे मदतकार्याचे नियोजन, अंमलबजावणी आणि त्याचा प्रत्यक्ष लाभ यांची नोंद ठेवली जाणार आहे.

"माझ्या वाढदिवसानिमित्त शहरात मोठमोठे होर्डिंग लागावेत, हार-तुरे आणि सत्कार व्हावेत, यापेक्षा एखाद्या गरजू कुटुंबाच्या घरात महिनाभराची अन्नधान्याची व्यवस्था व्हावी, हे माझ्यासाठी अधिक समाधानाचे आहे. समाजाने दिलेल्या प्रेमाची परतफेड समाजसेवेतूनच झाली पाहिजे. मुख्यमंत्री देवेंद्रजी फडणवीस यांच्या प्रेरणेतून आणि प्रदेशाध्यक्ष रवींद्रजी चव्हाण यांच्या मार्गदर्शनाखाली ५१ आदिवासी गावांपर्यंत मदतीचा हात पोहोचविण्याचा संकल्प आम्ही केला आहे. राजकारण हे केवळ निवडणुका आणि सत्तेपुरते मर्यादित नसून समाजातील शेवटच्या घटकाच्या अडचणीच्या काळात त्याच्या पाठीशी उभे राहण्याचे प्रभावी माध्यम आहे. माझ्या वाढदिवसानिमित्त मला शुभेच्छा देऊ इच्छिणाऱ्या प्रत्येकाने या माणुसकीच्या यज्ञात सहभागी व्हावे, हीच माझी अपेक्षा आहे."

- महेश लांडगे, भाजपा, पिंपरी-चिंचवड, पुणे.

'एक नगरसेवक, एक गाव' संकल्पनेतून मदतीचे नियोजन

उपक्रमाच्या पहिल्या टप्प्यात पुणे जिल्ह्यातील खेड, जुन्नर आणि आंबेगाव तालुक्यांतील ५१ आदिवासीपट्ट्यातील गावांची निवड करण्यात आली आहे. 'एक नगरसेवक, एक गाव' या संकल्पनेनुसार भोसरी विधानसभा मतदारसंघातील नगरसेवक किंवा नगरसेविकेकडे एका गावाची जबाबदारी सोपविण्यात आली आहे. संबंधित गावातील गरजू कुटुंबांची माहिती संकलित करणे, आवश्यक साहित्याचे नियोजन करणे आणि प्रत्यक्ष मदतवाटपाची जबाबदारी संबंधित लोकप्रतिनिधी आणि समन्वयक पार पाडणार आहेत. आमदार महेश लांडगे यांच्या कार्यालयामार्फत प्रत्येक गावासाठी स्वतंत्र समन्वयक उपलब्ध करून देण्यात आला आहे. प्रत्येक गरजू कुटुंबाला किमान एक महिना पुरेल इतके धान्य, किराणा आणि इतर जीवनावश्यक वस्तूंचे किट देण्याचे नियोजन करण्यात आले आहे. १५ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत संबंधित गावांना प्रत्यक्ष भेटी देऊन मदतवाटप पूर्ण करण्याचे उद्दिष्ट निश्चित करण्यात आले आहे.

भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाला नवे हायटेक रूप

शहराध्यक्ष शत्रुघ्न काटे यांच्या नेतृत्वाखाली संघटनात्मक कार्याला नवी दिशा

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

भारतीय जनता पार्टीच्या पिंपरी-चिंचवड शहर जिल्हा मध्यवर्ती कार्यालयाचे नूतनीकरण करून त्याला अत्याधुनिक स्वरूप देण्यात आले आहे. मोरवाडी येथील एम.एस.आर. कॅपिटलमध्ये उभारण्यात आलेल्या या नूतनीकृत कार्यालयाचे उद्घाटन भाजपचे महाराष्ट्र प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या हस्ते उत्साहपूर्ण वातावरणात करण्यात आले. फीत कापून आणि दीपप्रज्वलन करून नव्या कार्यालयाचे लोकार्पण करण्यात आले. या नव्या कार्यालयामुळे शहर भाजपच्या संघटनात्मक कामकाजाला नवी दिशा मिळणार असून कार्यकर्त्यांना कामासाठी आधुनिक व्यासपीठ उपलब्ध झाले आहे.





पिंपरी-चिंचवड शहर भाजपचे शहराध्यक्ष शत्रुघ्न 'बापू' काटे यांच्या अध्यक्षतेखाली हा उद्घाटन सोहळा पार पडला. यावेळी आमदार महेश लांडगे, आमदार शंकर जगताप, आमदार अमित गोरखे, आमदार उमा खापरे, भाजपचे प्रदेश सरचिटणीस राजेश पांडे, माजी खासदार अमर साबळे, माजी आमदार अश्विनी जगताप यांच्यासह पक्षाचे प्रमुख पदाधिकारी, लोकप्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

गेल्या काही काळात पक्षाच्या संघटनात्मक कामकाजाचा वाढलेला व्याप आणि कार्यकर्त्यांचा सहभाग लक्षात घेऊन मोरवाडी येथील मध्यवर्ती कार्यालयाचे आकर्षक व आधुनिक पद्धतीने नूतनीकरण करण्यात आले आहे. या नव्या वास्तूमध्ये प्रशस्त कॉन्फरन्स हॉल, डिजिटल मीडिया कक्ष, पदाधिकाऱ्यांसाठी आधुनिक केबिन, ग्रंथालय तसेच पक्षविस्तार आणि संघटनात्मक कामकाजासाठी आवश्यक अत्याधुनिक सुविधा उपलब्ध करून देण्यात आल्या आहेत.

या सुविधांमुळे पक्षाच्या बैठका, संघटनात्मक नियोजन, आगामी कार्यक्रमांची आखणी आणि कार्यकर्त्यांशी संवाद साधणे अधिक सुलभ होणार आहे. त्याचबरोबर सामान्य नागरिकांच्या अडचणी जाणून घेऊन त्या सोडविण्यासाठी संबंधित प्रशासकीय यंत्रणांकडे पाठपुरावा करण्याचे महत्त्वपूर्ण केंद्र म्हणूनही हे कार्यालय कार्यरत राहणार आहे.

या उद्घाटन सोहळ्यास भाजपचे संघटन सरचिटणीस मोरेश्वर शेडगे, सरचिटणीस मधुकर बच्चे, वैशाली खाडये, विकास डोळस, संजय पटणी, सत्तारूढ पक्षनेते प्रशांत शितोळे, स्थायी समिती सभापती अभिषेक बारणे, सदाशिव खाडे, उपमहापौर शर्मिला बाबर, सुजाता पालांडे, राजू दुर्गे, अनुप मोरे, राजेश पिल्ले, दिनेश यादव यांच्यासह पक्षाचे आजी-माजी नगरसेवक, विविध प्रकोष्ठांचे अध्यक्ष, मंडल अध्यक्ष, पदाधिकारी, महिला आघाडीच्या प्रतिनिधी आणि कार्यकर्ते मोठ्या संख्येने उपस्थित होते.

नूतनीकरण झालेल्या या भव्य आणि आधुनिक कार्यालयामुळे पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या संघटनात्मक बांधणीला बळ मिळणार असून पक्षाच्या आगामी वाटचालीसाठी हे कार्यालय महत्त्वाचे केंद्र ठरणार असल्याची भावना यावेळी पदाधिकारी आणि कार्यकर्त्यांनी व्यक्त केली.

> पिंपरी-चिंचवड शहर भाजपच्या मध्यवर्ती कार्यालयाचे प्रदेशाध्यक्ष रवींद्रदादा चव्हाण यांच्या शुभहस्ते दिमाखात उद्घाटन होणे हा आमच्यासाठी अत्यंत अभिमानाचा क्षण आहे. कार्यकर्त्यांना उत्तम सुविधा मिळाव्यात आणि तळागाळातील सामान्य नागरिकांच्या अडीअडचणी प्रभावीपणे सोडविता याव्यात, यासाठी हे कार्यालय आधुनिक आणि सुसज्ज करण्यात आले आहे. हे कार्यालय केवळ विटा-सिमेंटची वास्तू नसून प्रत्येक कार्यकर्त्याच्या ऊर्जेचे आणि जनसेवेचे व्यासपीठ असेल. प्रदेशाध्यक्षांच्या मार्गदर्शनाखाली आपण सर्वजण मिळून पिंपरी-चिंचवडमध्ये भाजपचा भगवा अधिक ताकदीने फडकवू.
>
> - शत्रुघ्न काटे, शहराध्यक्ष, भाजपा.

ताथवडेत मद्यधुंद चालकाचा धुमाकूळ; सिग्नलवर उभ्या रिक्षांना धडक देत कार पलटी

महाईन्यूज । पिंपरी-चिंचवड

ताथवडे ते रावेत दरम्यान मद्यप्राशन करून भरधाव वेगाने कार चालवणाऱ्या तरुणाने वाहनांनाच लक्ष्य केल्याची घटना घडली आहे. चालकाचे कारवरील नियंत्रण सुटल्याने त्याने सिग्नलवर थांबलेल्या रिक्षाला पाठीमागून जोरदार धडक दिली. त्यानंतर आणखी एका रिक्षाला धडक देत पुढे गेलेली कार समाधान हॉटेलसमोर पलटी झाली. या अपघातात एका महिला प्रवाशाला दुखापत झाली असून अनेक वाहनांचे नुकसान झाले आहे.



पोलिसांनी दिलेल्या माहितीनुसार, १३ नोव्हेंबर रोजी रात्री साडेदहा ते पावणेदहाच्या दरम्यान नरसिंह चौक, ताथवडे ते समाधान हॉटेल, रावेत या मार्गावर हा अपघात घडला. आरोपी अनुग्रह देविदास सूर्यवंशी (वय २३, रा. हिंजवडी) हा आपल्या ताब्यातील ह्युंदाई व्हर्ना कार (क्र. MH 26 A 2758) मद्यप्राशन करून भरधाव वेगाने व निष्काळजीपणे चालवत होता.

नरसिंह चौकातील सिग्नलवर थांबलेल्या फिर्यादी प्रदीप भागोजी सुरवसे (वय ३३) यांच्या रिक्षाला कारने पाठीमागून जोरदार धडक दिली. या धडकेत रिक्षासह समोरील बलेनो कारचेही नुकसान झाले. त्यानंतर आरोपीने पुढे जाऊन अजय राजनाथ जैस्वाल यांच्या रिक्षाला धडक दिली. अखेर समाधान हॉटेलसमोर आरोपीची कार पलटी झाली.

या अपघातात रिक्षातील प्रवासी लक्ष्मी संतोष बन्सल यांच्या डाव्या भुवईला आणि छातीला दुखापत झाली आहे.

याप्रकरणी १४ नोव्हेंबर रोजी वाकड पोलीस ठाण्यात आरोपीविरोधात भारतीय न्याय संहिता कलम २८१, १२५ (अ), ३२४ (४) तसेच मोटार वाहन कायदा कलम १८४, १८५ अन्वये गुन्हा दाखल करण्यात आला आहे. पुढील तपास पोलीस हवालदार बाबर करीत आहेत.

मराठी पत्रकार संघाच्या जीवनगौरव पुरस्काराने अम्मांचा सन्मान

निःस्वार्थ भावनेने काम करणाऱ्या लेकरांना पुरस्कार समर्पित; माता अमृतानंदमयी

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

"मराठी पत्रकार संघाने दिलेला हा पुरस्कार म्हणजे माझ्या लेकरांनी दिलेला पुरस्कार आहे. माझी लेकरं हाच माझा सर्वात मोठा पुरस्कार असून, जगाला निःस्वार्थ भावनेने सेवा देणाऱ्या या लेकरांना मी हा पुरस्कार समर्पित करते," अशा भावपूर्ण शब्दांत आंतरराष्ट्रीय ख्यातीच्या आध्यात्मिक गुरू तथा विश्वमाता माता अमृतानंदमयी (अम्मा) यांनी आपल्या भावना व्यक्त केल्या.



मराठी पत्रकार संघाच्या वतीने निगडी येथे शनिवारी (दि. १४ नोव्हेंबर) आयोजित सोहळ्यात केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ यांच्या हस्ते अम्मांना जीवनगौरव पुरस्कार प्रदान करून सन्मानित करण्यात आले. या सोहळ्याला आमदार महेश लांडगे, दैनिक सकाळच्या संपादक शीतल पवार, डी. वाय. पाटील विद्यापीठाच्या भाग्यश्री पाटील, कोहिनूर ग्रुपचे अध्यक्ष कृष्णकुमार गोयल, व्हीजे डेव्हलपर्सच्या अस्मिता जावडेकर, मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी, प्रदेश उपाध्यक्ष विवेक इनामदार आदी मान्यवर उपस्थित होते. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशाद्वारे या सोहळ्याला शुभेच्छा दिल्या.

अम्मा म्हणाल्या, महाराष्ट्र ही संत-महात्म्यांची भूमी आहे. छत्रपती शिवाजी महाराज आणि छत्रपती संभाजी महाराज यांनी त्याग व देशभक्तीचा आदर्श घालून दिला आहे. महाराष्ट्रातील महापुरुषांचे योगदान अत्यंत प्रेरणादायी आहे. समाजात धर्मभावना आणि नैतिक मूल्ये टिकवून ठेवण्यात पत्रकारांची भूमिका महत्त्वाची आहे. पत्रकारांनी आपली जबाबदारी प्रामाणिकपणे पार पाडावी, यासाठी मी प्रार्थना करते. अत्यंत विनम्र भावनेने हा पुरस्कार स्वीकारत असल्याचेही त्यांनी सांगितले.

केंद्रीय राज्यमंत्री मुरलीधर मोहोळ म्हणाले, महिलांना स्वावलंबी बनविण्याबरोबरच विकसित राष्ट्र घडविण्याच्या कार्यात अम्मांचे योगदान मोठे आहे. मायेचा अथांग सागर असलेल्या माता अमृतानंदमयी यांचा हा सत्कार म्हणजे कृतज्ञता सोहळा आहे. विश्वकल्याणासाठी आयुष्य समर्पित करणाऱ्या अम्मांना मी वंदन करतो.

अम्मा म्हणजे प्रेम, करुणा व मानवतेची मूर्ती : मुख्यमंत्री

मराठी पत्रकार संघाने माता अमृतानंदमयी यांना जीवन गौरव पुरस्काराने गौरविले. गडचिरोलीतील कार्यक्रमामुळे उपस्थित राहू न शकलेल्या मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी व्हिडिओ संदेशातून शुभेच्छा दिल्या. माताजींचे जीवन हे धर्म, जात, भाषा यांच्या पलीकडे जाऊन केवळ मानवतेसाठी समर्पित असल्याचे त्यांनी सांगितले. प्रेम, करुणा, ममता आणि निःस्वार्थ सेवेने त्यांनी असंख्य लोकांना नवी आशा दिली. शिक्षण, आरोग्य, महिला सक्षमीकरण आणि आपत्ती काळातील सेवेसह पर्यावरण क्षेत्रातील त्यांचे कार्य कौतुकास्पद असल्याचे गौरवोद्गार त्यांनी काढले.

अम्मांच्या मायेचा स्पर्श कोट्यवधी लोकांपर्यंत पोहोचला आहे. दुःखात असलेल्या लोकांना अध्यात्माने आधार दिला पाहिजे, या विचारातून अम्मांनी अध्यात्माला समाजसेवेचे स्वरूप दिले आणि करुणेला चळवळीचे रूप दिले. सामाजिक कृतज्ञतेच्या भावनेतून त्या कार्य करतात. नैसर्गिक आपत्तीच्या काळातही त्यांनी मोठा मदतीचा हात पुढे केला आहे. त्यांच्या या महान कार्याला मी वंदन करतो. पुणे ही संतांची भूमी असून या संतभूमीत अम्मांचे स्वागत करताना आनंद होत असल्याचे मोहोळ यांनी नमूद केले.

कार्यक्रमाचे प्रास्ताविक मराठी पत्रकार संघाचे प्रदेशाध्यक्ष किरण जोशी यांनी केले. संदीप चव्हाण यांनी सूत्रसंचालन केले, तर विवेक इनामदार यांनी आभार मानले.

संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय हवामान परिषदेत महापालिकेच्या 'हरित सेतू' प्रकल्पाचे कौतुक!

महाईन्यूज | पिंपरी-चिंचवड

पिंपरी चिंचवड महापालिकेच्या वतीने राबविण्यात येत असलेल्या 'हरित सेतू' या पर्यावरणपूरक उपक्रमाची संयुक्त राष्ट्रांच्या हवामान बदलविषयक आंतरराष्ट्रीय परिषदेत (UNITED NATIONS FRAMEWORK CONVENTION ON CLIMATE CHANGE – UNFCCC COP31) दखल घेण्यात आली आहे. तुर्कीये येथील अंटाल्या शहरातील अंटाल्या एक्स्पो सेंटर येथे ९ ते २० नोव्हेंबर २०२६ या कालावधीत ही आंतरराष्ट्रीय परिषद आयोजित करण्यात आली आहे. या परिषदेत १४ नोव्हेंबर २०२६ रोजी पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'हरित सेतू' प्रकल्पाचे सादरीकरण करण्यात आले. शहराच्या पर्यावरण संवर्धनासाठी महापालिकेकडून राबविण्यात येत असलेल्या उपक्रमाची जागतिक स्तरावर दखल घेतली जाणे, ही पिंपरी चिंचवडसाठी अभिमानास्पद बाब ठरली आहे.



> पिंपरी चिंचवड शहराच्या विकासाचा प्रवास हा केवळ पायाभूत सुविधांपुरता मर्यादित नसून पर्यावरणाचे संवर्धन आणि भावी पिढ्यांसाठी हरित, स्वच्छ व शाश्वत शहर निर्माण करण्याचाही आहे. महापालिकेच्या 'हरित सेतू' प्रकल्पाचे संयुक्त राष्ट्रांच्या आंतरराष्ट्रीय हवामान परिषदेत कौतुक होणे, ही संपूर्ण पिंपरी चिंचवडकरांसाठी अभिमानाची बाब आहे. स्थानिक पातळीवर राबविल्या जाणाऱ्या पर्यावरणपूरक उपक्रमांना जागतिक स्तरावर प्रशंसा मिळणे, ही शहराच्या विकासासाठी प्रेरणादायी बाब आहे. पर्यावरण संवर्धनाच्या अशा उपक्रमांना महापालिकेच्या माध्यमातून अधिक व्यापक स्वरूप देण्यासाठी आम्ही कटिबद्ध आहोत.
>
> - रवि लांडगे, महापौर, पिंपरी चिंचवड महानगरपालिका

जागतिक स्तरावर हवामान बदलाचे वाढते आव्हान, पर्यावरणाचे संवर्धन आणि शाश्वत विकास या विषयांना अनन्यसाधारण महत्त्व प्राप्त झाले आहे. या पार्श्वभूमीवर जगभरातील विविध देश, संस्था आणि स्थानिक स्वराज्य संस्था पर्यावरणपूरक विकासासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवत आहेत. या आंतरराष्ट्रीय परिषदेतही अशा विविध उपक्रमांचे सादरीकरण आणि त्यावर चर्चा करण्यात येत आहे. याच व्यासपीठावर पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'हरित सेतू' प्रकल्पाचा समावेश होणे, ही शहराच्या पर्यावरणपूरक विकासाच्या प्रयत्नांना मिळालेली महत्त्वपूर्ण आंतरराष्ट्रीय पोहोच आहे.

युरोपमध्ये सुरू असलेल्या विविध कार्यक्रमांमध्येही 'हरित सेतू' प्रकल्पाची चर्चा करण्यात आली. भारतामध्ये जगाला हेवा वाटावा असे अनेक नावीन्यपूर्ण उपक्रम राबविले जात असून, पर्यावरण संवर्धनाच्या क्षेत्रात पिंपरी चिंचवड महापालिकेनेही पुढाकार घेतल्याचा उल्लेख यावेळी करण्यात आला. त्यामुळे स्थानिक पातळीवर सुरू असलेल्या पर्यावरणपूरक प्रयत्नांना आंतरराष्ट्रीय व्यासपीठावर मांडण्याची संधी मिळाली आहे.

हवामान बदलाच्या आव्हानांना सामोरे जाताना स्थानिक स्वराज्य संस्थांची भूमिका महत्त्वाची ठरत आहे. पिंपरी चिंचवड महापालिकेच्या 'हरित सेतू' प्रकल्पाला मिळालेली आंतरराष्ट्रीय स्तरावरील दखल ही शहराच्या पर्यावरण संवर्धनाच्या प्रयत्नांना मिळालेली नवी ओळख असून, शाश्वत आणि पर्यावरणपूरक शहराच्या दिशेने सुरू असलेल्या वाटचालीसाठी ती प्रेरणादायी ठरणार आहे

पिंपरी चिंचवड महानगरपालिका नेहमीच राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील विविध उपक्रमांमध्ये सक्रिय सहभाग नोंदवत शहराच्या विकासासाठी प्रयत्नशील असते. शहरात गेल्या वर्षापासून सुरू झालेल्या 'पुणे ग्रँड टूर' या आंतरराष्ट्रीय सायकल स्पर्धेच्या यशस्वी आयोजन आणि अंमलबजावणीमध्ये पिंपरी चिंचवड शहराचा महत्त्वपूर्ण सहभाग राहिला आहे. तसेच केंद्र शासनाच्या 'इंडिया सायकल्स फॉर चेंज चॅलेंज' या उपक्रमामध्ये देशातील १०० शहरांमधून पिंपरी चिंचवड शहराने पहिल्या पाच शहरांमध्ये स्थान मिळवले होते. या उपक्रमात शहराने वैयक्तिक स्तरावरही विक्रम नोंदवला आहे.

स्मार्ट सिटी आणि केंद्रीय गृहनिर्माण व शहरी व्यवहार मंत्रालयाने आयोजित केलेल्या विविध उपक्रमांमध्ये महापालिकेचे अधिकारी सहभागी झाले आहेत. यामध्ये बापूसाहेब गायकवाड, सुनील पवार, अमित दीक्षित, स्वप्नील शिर्के, अनंत चिटके, प्रसाद देशमुख आदी अधिकाऱ्यांनी आपल्या उल्लेखनीय कामगिरीतून शहराच्या नावलौकिकात भर घातली आहे. राष्ट्रीय आणि आंतरराष्ट्रीय स्तरावरील अशा विविध उपक्रमांमधील सहभागातून पिंपरी चिंचवड शहर पर्यावरणपूरक, शाश्वत आणि नावीन्यपूर्ण विकासाच्या दिशेने सातत्याने वाटचाल करत आहे.

Express
Media Enterprises

Professional Live set up with live drone available..

- Documentary
- Weddings
- Drone
- Motion Graphics
- Testimonials
- Tutorial videos
- Product Videos
- Animation
- Social Media Content
- Promotional Videos
- Real Estate
- Corporate
- Advertising
- Events



PUNE

Contact: 9657767000/9370493922/9664188046